Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 95 – 100
DOI: 10.5281/zenodo.10072615

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

प्रा. डॉ. गिरे संजय भाऊराव

विभाग प्रमुख, इतिहास विभाग (UG & PG), वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sanjaygire2012@gmai.com

Received: 11 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

**प्रस्तावना**

अहिंसेच्या तत्त्वज्ञानातून आचार, विचार, आणि प्रत्यक्ष कृतीमधून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणारे युगपुरुष म्हणजे महात्मा गांधी हे होत. देशाची प्रगती साधायची असेल तर त्या प्रगतीचा आत्मा म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी आपले शिक्षण विषयक उच्च विचार मांडले. अहिंसेचे पुजारी हातात शस्त्र न घेता निक्षत्रपणे लढून स्वातंत्र्य मिळवून देणारे स्वातंत्र सैनिक, समाज सुधारक, तत्त्वचिंतक, राष्ट्रपिता व शिक्षणतज्ञ अशा विविध जबाबदाऱ्या पेलताना त्यांनी आपल्या विचारातून व प्रत्यक्ष कृतीतून शिक्षणाचे माध्यम, शिक्षणाची उद्दिष्टे, प्रौढशिक्षण विषयक मत, शिक्षक व विद्यार्थी यांचे कर्तव्य, स्त्री शिक्षण, स्वावलंबन, शारीरिक शिक्षण, नैतिकता, प्रामाणिकपणा, धर्मनिरपेक्ष शिक्षण, लैंगिक शिक्षण, आणि नई तालीम अथवा वर्धा शिक्षण याविषयी आपले विचार मांडले. सामाजिक उन्नतीसाठी शिक्षण हे दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरते शोषण - विरहित समाजाची निर्मिती करायची असेल तर त्यासाठी शिक्षण आवश्यक आहे अशी त्यांची धारणा होती. अहिंसक, न्यायपूर्ण, समता व सहकार्य आधारित समाज संस्कृतीची निर्मिती व्हावी यासाठी महात्मा गांधी यांनी सेवाग्राम येथे 'नई तालीम' या अभिनव शिक्षण पद्धतीची सुरुवात केली होती त्यांचे शिक्षण विषयक विचार पुढील प्रमाणे.

**महत्वाचे शब्द:** महात्मा गांधी, शैक्षणिक विचार, शैक्षणिक धोरण, वर्धा शिक्षण योजना

## महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक धोरण

शिक्षणाच्या संदर्भात महात्मा गांधी म्हणतात "बुद्धी, हृदय आणि आत्मा यांचा संगम म्हणजे शिक्षण होय"[1]. इ. स. १९०८ मध्ये हिंद - स्वराज्य या पुस्तकाद्वारे महात्मा गांधी यांनी आपले शिक्षण विषयक विचार प्रसिद्ध केले होते. शिक्षण

पद्धती ही जीवनाभिमुख असायला हवी स्वावलंबन, स्वाभिमान, श्रम, प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर आधारित होती ऑक्टोबर १९३७ वर्धा येथे गांधीजींनी एक शैक्षणिक परिषद आयोजित केली होती. येथे त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले होते. या परिषदेला विनोबा भावे, डॉ. झाकीर हुसेन, काकासाहेब कालेलकर, दादा धर्माधिकारी, बाळासाहेब खेरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या सर्वांनी येथील परिषदेमध्ये विचार मंथन करून एक शिक्षण योजना तयार केली त्यालाच मूलद्योग शिक्षण योजना अथवा वर्धा शिक्षण योजना या नावाने ओळखले जाते

**मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम**

शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे असे महात्मा गांधी यांचे मत होते. प्रत्येक प्रादेशिक भाषेचे महत्त्व वाढवण्यासाठी त्यांच्याच मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे जेणेकरून विद्यार्थ्यांची मानसिक वैचारिक आणि सांस्कृतिक वाढ योग्य प्रकारे होईल. आपल्या मातृभाषेचा दर्जा व महत्त्व वाढविण्यासाठी सरकारी कार्यालयाचे कामकाज, कोर्टकचेऱ्यांचे काम व सर्व शासन व्यवहाराची भाषा ही त्या त्या राज्याच्या मातृभाषेतूनच चालली पाहिजे असे महात्मा गांधी यांचे मत होते. हिंदी भाषेची इतर भाषांशी असलेली जवळीकता व साम्य लक्षात घेऊन महात्मा गांधींनी हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिला होता. इंग्रजी भाषेचा वाढता उपयोग कटाक्षाने टाळायला हवा इंग्रजी भाषा शिक्षणासाठी व समजून घेण्यासाठी अधिक वेळ खाते त्यामुळे शिक्षण हे मातृभाषेतूनच घेतले पाहिजे असे महात्मा गांधी यांना वाटत होते. तरीपण त्यांनी इंग्रजी भाषेला दुय्यम संबोधले नाही कारण विज्ञान, व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यवहार या क्षेत्रात इंग्रजी भाषेचे स्थान भक्कम होते.

**प्रौढ शिक्षण विषयक विचार**

शिक्षण घेतल्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो लहान मुलांबरोबरच प्रैढानाही शिक्षण देऊन साक्षर केले पाहिजे असे गांधीजींचे मत होते. प्रोढ शिक्षणामुळे प्रोढ स्वावलंबी बनतील त्यांच्या जीवनातील येणाऱ्या समस्या व अडचणी ते सोडवतील. परंतु त्यांचे हे शिक्षण केवळ अक्षर ओळखीपर्यंतच मर्यादित राहू नये समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धेला आळा घालण्यासाठी प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे खेड्यातील लोकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित रोजच्या व्यवहारात उपयोगी ठरेल असे शिक्षण त्यांना दिले पाहिजे. यासाठी गांधीजी म्हणतात "या ज्या आमच्या आजच्या देशात लक्षावधी माणसे उपाशी मरत आहेत तेथे जाणिवेने श्रम करण्याचे शिक्षण देणे म्हणजे प्रौढ शिक्षण ठरेल हस्तकौशल्या नंतर शब्दज्ञान झालेले चालेल"[2]. प्रोढ शिक्षणातून अपेक्षित व्यवहारी ज्ञान त्यांना मिळाले पाहिजे असे महात्मा गांधी यांना वाटत होते. केवळ अक्षर ज्ञान न मिळता श्रमाच्या साह्याने त्यांचे व्यवहार सुरळीत चालवण्यासाठी प्रौढाणा कौशल्याधारित शिक्षण मिळावे असे त्यांना वाटत होते.

**धार्मिक शिक्षण विषयक विचार**

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सर्वधर्मसमभाव निर्माण होण्यासाठी सहिष्णुता वाढीसाठी आणि सदगुणाचा विकास होण्यासाठी धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे महात्मा गांधी यांना वाटत होते. आपला धर्म श्रेष्ठ आणि इतर धर्म

कनिष्ठ अथवा दुय्यम आहेत अशी शिकवण विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये सर्व विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभावाची भावना जोपासण्यासाठी धार्मिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता असते. प्रत्येक धर्माचा अभ्यास केल्यामुळे त्या धर्मातील चांगल्या तत्त्वज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळते. धार्मिक शिक्षणाचे कार्य धार्मिक संस्थांनी करावे. आई-वडिलांनी आपल्या मुलांना धर्मग्रंथाची ओळख करून द्यावी या सर्व गोष्टीमुळे मुलांच्या आत्मिक व अध्यात्मिक विकास होतो असे गांधीजींना वाटत होते.

**विद्यापीठीय शिक्षण विषयक विचार**

विद्यापीठाच्या शिक्षणविषयक धोरणाविषयी महात्मा गांधी म्हणतात "आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे आपले जीवन समर्पित करतील असे सच्चे जनसेवक निर्माण करणे हे आपल्या विश्वविद्यालयातील शिक्षणाचे ध्येय असले पाहीजे"[3]. शाळा महाविद्यालय हे चरित्र- संवर्धनाची केंद्र असायला हवीत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये देशासाठी सर्वतोपरी त्यागाची वृत्ती निर्माण व्हायला पाहिजे असे विद्यापीठीय शिक्षण विषयक विचार महात्मा गांधी यांनी १९२१ मध्ये गुजरात विद्यापीठाच्या स्थापनेच्या निमित्ताने व्यक्त केले होते. विविध क्षेत्रात उच्च विद्यापीठीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आपापल्या क्षेत्रातील समाज उपयोगी व राष्ट्रहिताच्या कार्यासाठी शिक्षण प्रणालीचा उपयोग झाला पाहिजे असे मत व्यक्त केले होते. विद्यापीठीय शिक्षण प्रणाली व राष्ट्रीय गरजांचा खूप निकटचा संबंध असतो असे महात्मा गांधी मानतात.

**स्त्री शिक्षण विषयक विचार**

पुरुषाबरोबर स्त्रियानाही शिक्षणाची तितकीच गरज आहे त्यांनाही पुरुषाच्या बरोबरीने संधी मिळाली तर समाजाच्या विकासाला गती मिळेल यावर महात्मा गांधी यांचा विश्वास होता. स्त्रीला केवळ भोगदाशी न मानता सखी सहचारिणी मानून त्यांना बालसंगोपन, स्वच्छता, आहारशास्त्र, कुटुंब उपयोगी ठरेल असे शिक्षण द्यायला हवे असे महात्मा गांधी म्हणतात. अनिष्ट रूढी प्रथा परंपरेमुळे भारतातील स्त्री ही अशिक्षित राहिली स्त्री पुरुष समानतेचा विचार मांडून आपले कुटुंब सुधारावयाचे असेल तर स्त्री शिक्षण ही काळाची गरज आहे असे गांधींचे मत होते. महात्मा गांधी यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता स्त्रिया शिक्षण घेऊन आत्मनिर्भर बनल्या पाहिजे स्त्रीने शिक्षण घेतल्यास कुटुंबाचा विकास होईल तसेच आर्थिक व्यवहारात व नौकरीच्या दृष्टिकोनातून इंग्रजी भाषेचे ज्ञान देखील स्त्रियांना असणे आवश्यक आहे असे गांधी म्हणत असत. स्त्री पुरुष समानतेसाठी व एकंदरीत कुटुंबाच्या प्रगतीसाठी स्त्रिया शिकल्याच पाहिजे असे गांधीजींना वाटत होते.

शिक्षित स्त्रियांनी सुद्धा अंधानुकरण न करता शिक्षण सदाचार चारित्र्य व समयशीलता बाळगली पाहिजे. नोकरी व व्यापार करण्याबाबत स्त्रिया विषयी गांधीजींची मान्यता नव्हती पण एक लवचिकता कायमची होती याविषयी महात्मा गांधी म्हणतात "स्त्रियांचे विशेष शिक्षण कसे असावे व ते केव्हा सुरू व्हावे याबद्दल मी विचार केला आहे व लिहिले आहे. तरीपण याबाबतीत माझी ठाम अशी मते बनलेली नाहीत पण जेवढ्या सोयी सवलती पुरुषांना मिळतात तेवढ्या

स्त्रियानाही मिळाल्या पाहिजेत हे माझे निश्चित मत आहे"[4]. एकंदरीत स्त्री शिक्षण विषयक गांधीजींच्या विचारात व भूमिकेत बदल होत गेले परंतु पुढच्या टप्प्यावर जात असताना ते अधिक समृद्ध होत गेले स्त्री पुरुष समानतेचा विचार त्यांनी समाजामध्ये रुजवला त्यामुळे स्त्रियांना शिक्षण घेणे अधिक सोयीस्कर झाले.

**शारीरिक व व्यवसाय भिमुख शिक्षण**

शारीरिक शिक्षणाला बौद्धिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान दिले पाहिजे शरीर निरोगी आणि सुदृढ तरच लक्षपूर्वक व क्षमतेने काम होईल त्यासाठी शरीर श्रमाला विशेष महत्त्व आहे असे गांधी म्हणत. जितके शरीर चांगले तितकेच मन चांगले राहिले सदृढ शरीर असेल तर विद्यार्थी अधिक कार्यक्षम व कुशल होण्यास मदत होते म्हणून शरीर श्रमाला शिक्षणात महत्त्वाचे स्थान असले पाहिजे याविषयी गांधी म्हणतात. "कसरतीचा शिक्षणाशी संबंध नाही अशी चुकीची समजूत माझी त्यावेळी होती नंतर मी समजलो की व्यायामाला म्हणजे शारीरिक शिक्षणाला मानसिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान विद्यार्जनात असले पाहिजे"[5]. शारीरिक शिक्षणासोबतच शारीरिक श्रम आणि प्रशिक्षण याचाही आंतरभाव शिक्षणात असणे अतिशय महत्त्वाचे आहे. विणकाम, सुतकताई, शेती, मातीकाम, हस्तकला, बागकाम, पुस्तक बांधणी या कृतिशील उपक्रमाला त्यांनी महत्त्व दिले. विद्यार्थ्यांना व्यवसायभिमुख शिक्षण देऊन त्यांची अर्थार्जनाची क्षमता विकसित केली पाहिजे गांधीजीने श्रमाला शिक्षणात स्थान दिले तसेच विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व त्यांनी कृतीतून दाखवून दिले. गांधीजीने नैतिकता व प्रामाणिकपणाला शिक्षणाचा महत्त्वाचा भाग मानला व ते विद्यार्थ्यांमध्ये रुजवला गेला पाहिजे याचा आग्रह धरला एकंदरीत शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थी निरोगी बनतो, त्यांच्या शरीराचा योग्य विकास होतो सोबतच त्यांच्या बौद्धिकत्तेचाही चांगला विकास होतो शिवाय व्यायामामुळे ते आजारी पडत नाहीत त्यामुळे शारीरिक शिक्षण व व्यवसाय प्रमुख शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे गांधीजींचे ठाम मत होते.

**विद्यार्थी व शिक्षक यांच्या कर्तव्या विषयक विचार**

शिक्षणातून विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबर स्वावलंबन आणि उपजीविकेसाठी लागणाऱ्या क्षमता व कला प्राप्त केल्या पाहिजेत शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्वोत्तम गुणांचा विकास झाला पाहिजे. समाजाने केलेले कायदे आणि नियमाचे पालन करण्यासाठी स्वयंशिस्त महत्त्वाची असून विद्यार्थ्यांना बाहेरून शिस्त लादु नये, विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडणघडण व्हावी सदाचार, संयम, सहिष्णुता, आत्मनिर्भरता, सत्याग्रह अशा गुणाची जोपासना शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत झाली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा मानसिक भावनिक बौद्धिक व शारीरिक विकास साधला जावा शिक्षण हे सामाजिक वातावरणास पोषक असले पाहिजे, शिक्षणातून भारतीय संस्कृतीची जोपासना झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे, त्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन देणारे, विद्यार्थ्यांची आवड निवड व रुची यांचा विचार करून शिक्षण दिले तर त्यांचे चारित्र्य घडेल असे गांधीजींना वाटत होते. आजचे विद्यार्थी हे उद्याचे भविष्य असतात त्यामुळे त्यांनी जबाबदारीने वागले पाहिजे विद्यार्थ्यांनी त्यांचे आदर्श स्वतः निवडून

चांगले गुण आत्मसात करावे. जात, धर्म, अस्पृश्यता, भेदाभेद विद्यार्थ्यांनी मानू नये. सहकार्याची वृत्ती अंगी ठेवून सर्वांना मदत करावी, आपली शाळा परिसर व गाव स्वच्छ ठेवावे, व्यसना पासून दूर राहावे .समाज उपयोगी कामात पुढाकार घेऊन मिळालेल्या ज्ञानाचा स्वतःबरोबर समाजाचा व पर्यायाने राष्ट्राच्या विकासासाठी वापर करावा.

शिक्षकाची कर्तव्य या विषयी महात्मा गांधी म्हणतात "शिक्षक हे विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक असावेत"[6]. प्रत्येक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्याला योग्य न्याय शिक्षकाकडून मिळाला पाहिजे केवळ पाठ्यपुस्तक शिकवणे हा शिक्षकाचा हेतू नसावा तर पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन आदर्श मूल्य विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकाने रुजवली पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्यांच्या चुका विषयी त्यांना शारीरिक शिक्षा न देता त्यांनी चुका का केल्या हे शोधून काढून पुन्हा विद्यार्थ्याकडून चुका होणार नाहीत यांची काळजी शिक्षकाने घेतली पाहिजे असे गांधीजींना वाटत होते. वारंवार विद्यार्थी चुकत असेल तर त्याचा दोषी गांधीजीने शिक्षकाला मानले तेव्हा शिक्षकानेच आत्मपरीक्षण करणे अत्यावश्यक आहे असे गांधींना वाटते. चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडवणे हे शिक्षकाचे व शाळेचे मुख्य ध्येय असावे चारित्र्य घडवणारे शिक्षक हे स्वतः चारित्र्यसंपन्न असले पाहिजे असे गांधीजींचे ठाम मत होते.

**वर्धा शिक्षण योजना**

२३ व २४ ऑक्टोबर १९३७ रोजी महात्मा गांधी यांनी वर्धा येथे भारतातील शिक्षण तज्ञांची परिषद बोलावली होती. त्यांच्या समोर महात्मा गांधीजीने आपली शिक्षण विषयक योजना मांडली त्यालाच वर्धा योजना, बुनियादी शिक्षा अथवा नई तालीम या नावाने ओळखले जाते. या परिषदेला विनोबा भावे, डॉ. झाकीर हुसेन. काकासाहेब कालेकर, धर्माधिकारी व बाळासाहेब खेरे इत्यादी प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या. देशातील प्रत्येक मुलाला आठ वर्ष सक्तीचे व मोफत शिक्षण मातृभाषेतून मिळाले पाहिजे म्हणजेच मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे, उत्पादक उद्योगाद्वारे शिक्षण देण्याची योजना असावी म्हणजे हस्त कौशल्याधारित शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात यावे तसेच उत्पादक उद्योगांमधून शिक्षकाच्या वेतनाचाही प्रश्न सोडवण्यात यावा याला महत्व देण्यात आले. एकदम उद्धात आणि स्वच्छ हेतू डोळयासमोर ठेवून राष्ट्राला एक नवीन शिक्षण योजना देण्याचा प्रयत्न महात्मा गांधी यांनी केला परंतु पुढे गांधी नंतरच्या व्यवस्थापकाने या योजनेबद्दल फारच उदासीनता बाळगली त्यामुळे ही योजना कळानुरूप कालबाह्य बनुन अयशस्वी झाली. परंतु बदलत्या काळानुरूप पुन्हा एकदा कौशल्य विकास Skil India या स्वरूपात गांधींच्या विचारातील शिक्षण पद्धती रूढ होताना दिसून येत आहे.

**सारांश**

सत्य आणि अहिंसेची शिकवण सर्व जगाला देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये विविध प्रयोग करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या शैक्षणिक धोरणाचा केंद्रबिंदू हा विद्यार्थी होता. शिक्षणाचा संबंध हा अभ्यासक्रम अथवा पाठ्यपुस्तकाशी नसून जिवंत अनुभवाशी असतो अशा अनुभवाधारित शिक्षण पद्धतीचा त्यांचा मुलगामी विचार होता. केवळ पुस्तकी शिक्षणाऐवजी शारीरिक आणि बौद्धिक अशा दोन्ही श्रमाची जोड घालून शिक्षण दिले पाहिजे विशेषतः

हस्त उद्योगाच्या माध्यमातून शिक्षण देण्याचा त्यांनी आग्रह केला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे तसेच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी असा आग्रह धरला. एकंदरीत विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाचा विचार गांधीजींनी त्यांच्या शिक्षण पद्धतीत केला आहे. या शिक्षण प्रणालीतील मूल्य शिक्षण ते व्यवसाय शिक्षण अशा अनेक बाबीचा समावेश देशाच्या सर्व शैक्षणिक धोरणात झाल्याचे आपल्याला दिसून येते विशेषतः नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात यावरच अधिक भर देण्यात आला आहे

**संदर्भ सूची**

१. अकोलकर ग.वि. (संपा) गांधीविचारदर्शन:शिक्षण विचार खंड - ११ महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन समिती, पुणे, तिसरी आवृत्ती, १९९४, पृ. १७
२. गांधी मो.क, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पाचवी आवृत्ती, २०१६, पृ. ६४
३. अकोलकर ग. वि (संपा) गांधीविचारदर्शन: शिक्षण विचार खंड, १९, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन समिती, पुणे तिसरी आवृत्ती, पृ. १३१
४. अकोलकर ग वि, शिक्षण विचार, खंड - ११ उपरोक्त पृ. १३६-३७
५. गांधी मो.क, सत्याचे प्रयोग (आत्मकथा) (अनुवादक) सी पु नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद, चौतीसवा पुनर्मुद्रन, फेब्रुवारी २०१३, पृ. १४
६. जोशी रा. ना, महात्मा गांधी विचार विमर्श, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पृ. १९